# अंबरनाथमध्ये गरजूंना मिळाला हक्काचा निवारा

स्थानिक स्वराज्य संस्थांना रात्र निवारा केंद्र सुरु करण्याचे आदेश शासनाने दिले आहेत. त्यानुसार अंबरनाथ नगरपरिषदेने शहरी बेघरांसाठी निवारा केंद्र सुरु केले आहे. केंद्र शासनाच्या राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियानांतर्गत दिनद्याळ अंत्योदय योजनेतून हे बेघर निवारा केंद्र सुरु केले आहे.










शहराच्या पश्चिम भागातील हौसिंग बोर्ड येथे अंबरनाथ नगरपरिषदेने तात्पुरते हे केंद्र सुरु केले असून या ठिकाणी सध्या तीस बेघरांची सोय होऊ शकेल अशी व्यवस्था करण्यात आली आहे. सकाळी आठ वाजता नाश्ता, दुपारी जेवण, सायंकाळी पुन्हा चहा नाश्ता आणि रात्रीचे जेवण, झोपण्यासाठी पलंग, चादर, गादी, अंघोळीसाठी स्वच्छता गृहाची सोय करण्यात आलेली आहे. तर उलन चाळ येथे नगरपरिषदेच्या एका भूखंडावर तब्बल 1 कोटी 80 लाख रुपये खर्चून शहरी बेघरांसाठी तीन मजली निवारा केंद्र तयार करण्याचे काम सुरु करण्यात आले आहे. येत्या वर्षभरात या इमारतीचे काम पूर्ण होईल अशी अपेक्षा आहे.